# अमरावती शहर  दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक  २५/०७/२०२३

- दुखापत :-

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | पो.स्टे राजापेठ अप.क्र.६८६/२३ कलम ३२४,२९४,३४ भा.द.वि. | अमरावती | घ.ता.वेळ<br>दि. २४/०७/२०२३ चे १६-०० वा. दरम्यान<br>दा.ता.वेळ<br>दि. २५/०७/२०२३ चे ००-१५ वा. | आकाश संजय चंदनपत्री वय ३५ वर्ष रा. गोपाल नगर अमरावती | १)रविंद्र नामदेवराव शेगोकार वय ५५ वर्ष रा. अमरावती<br>व २) एक महिला | थोडक्यात हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील फिर्यादीचे शेजारी आरोपी राहत असुन त्याचे घराचे बांधकाम सुरू असल्याने दि. २३/०७/२०२३ रोजी स्लॅप पडल्याने त्याचे घरावरील पाणी फिर्यादीचे घरात येत होते. तेव्हा फिर्यादीने त्याची विल्हेवाट लावली तेव्हा आरोपी तेथे हजर नव्हते. नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी फिर्यादीस आरोपी दिसल्याने त्यास म्हटले की, तुझ्या घराचे सर्व पाणी माझ्या घरात येत आहे, त्याची तु व्यवस्था लाव असे म्हटले असता आरोपीने मी कोणाची ऐकत नाही, तुला काय करायचे आहे ते कर, असे म्हटले असता त्याच्यात वाद झाला व आरोपीने अश्लील शिवीगाळ केली. फिर्यादीने त्यास मी तुला चांगल्याने समजावत आहे तु मला शिवीगाळ करत आहे असे म्हटले असता त्याने सेंट्रींगच्या बांधकामाच्या बल्लीने डोक्यावर मारल्याने डोके फुटले व महिला आरोपीने अश्लिल शिवीगाळ केली फिर्यादी खाली पडले असता तिने लाथाबुक्याने मारहान केली. अशा फि.चे जबानी रिपोर्ट वरून व मडी. सर्टी .वरून सदरचा गुन्हा दाखल |

➢ खुनाचा प्रर्यत्न :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | पो.स्टे.गाडगे नगर अप.क्र. ९५४/२०२३ कलम ३०७, ५०४,५०६(ब) भा.द.वि सहकलम ४/२५ आर्म अकट | अमरावती | दि. २५.०७.२३ चे ०१.३० वा | एक महिला | अभिषेक साहु वय २१ वर्ष. रा. साहुबाग जवळ अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, दि. २४.०७.२३ रोजी माझे पती सकाळी ०८.००वा हमाली करीत गेले व दुपारी ०४.००वा घरी परत आहे व रात्री आम्ही १०.००वा जेवन केले. पती घराजवळील पान ठेल्यावर गेले व बराच वेळ झाल्याने पती घरी न आल्याने मी मुलाला पतीला बोलावुन आणण्यास सांगितले. मी घरात झोपुन गेली. तर दि.२५.०७.२३ रोजी अंदाजे ०१.३०वा मुलगा हा आला व त्याने मला झोपेतुन उठविले व सांगितले की, अभिषेक साहु व बाबा यांचे शितला माता मंदीरजवळ भांडण झाले व अभिषेक साहु याने बाबाला पाठीमागुन तलवार मारली असे सांगितले. मी लगेच मुलासोबत शितला माता मंदीर जवळ गेली. तरी पती यांचे डोक्याला तलवार मारण्याची मोठी जखम झाली व ते रक्त बंबाळ झाले तर त्यांनी मला सांगितले की, अभिषेक साहु यास चो-या करत जाऊ नको असे म्हणुन मी त्यास थापड मारली तर त्याने मला शिवीगाळ केली व आमची हाथापाई झाली त्यानंतर अभिषेक साहु हा धावत घरी गेला. तरी मी परत घरी जात असताना अभिषेक साहु हा पाठीमागुन एकदम आला व त्याने त्याच्या हातातील लोखंडी तलवार माझ्या डोक्याचे मागुन मानीच्या वर मारली. तुला जिवाने मारतो. असे म्हटल्याने मी तेथुन पळालो असे सांगितले. अभिषेक साहु यांने धावत जावुन घरातुन तलवार आणुन माझया पतीला जिवे मारण्याचे उद्देशाने डोक्यावर तलवार मारुन गंभीर जखमी केले. असा फि.चे जबानी रिपोर्टवरुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ विनयभंग :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | गु.घटना ता व वेळ<br>माहिती ता.वेळ<br>गु.दाखल ता. वेळ | आरोपीचे नाव व पत्ता | | हकीकत |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ५ | ७ | | १० |
| १ | पो.ठाणे बडनेरा, अप क्र. ५४८/२३ क ३५४(क), ३५४[ड] (१) भादवि | दि.२४.०७.२३ चे २०.०० वा<br>दि.२५.०७.२३ चे ०६.०० वा<br><br>दि. २५.०७.२३ चे ०७.३२ वा. | पिडीत महिलेचा सावत्र वडील | | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील आरोपी हा फिर्यादीचा सावत्र बाप असुन तो फिर्यादीस घरात कपडे बदलवित असतांना चोरून पाहत असतो तसेच तो फिर्यादीचा पाठलाग करत असतो. नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी फिर्यादी ही संडासला गेली असता संडासचा काही भाग अपु-या भिंतीमुळे उघडा असल्याने आरोपीने फिर्यादीस डोकावुन पाहीले. फिर्यादीने लगेच तिचे कपडे सावरून संडासचे बाहेर आली व तिने घडलेला प्रकार तिच्या आईस सांगितला. आरोपीने केलेल्या लज्जास्पद कृत्यामुळे फिर्यादीने पो.स्टे. बडनेरा येथे दिलेल्या जबानी रिपोर्टवरून सदरचा गुन्हा दाखल |

➢ वाहन चोरी :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ<br>माहिती ता.वेळ<br>गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | खोलापुरी गेट अमरावती शहर 144/23कलम 379 | फिर्यादीचे भावाचे घरासमोर अस्मिता शाळेच्या समोर पार्वती नगर नं २ | घटना ता वेळ 22/07/2023 चे 23/30 ते दि 23/07/23 चे 00.30वा सुमारास<br><br>माहीती ता वेळ<br><br>दि.25/07/2023 चे 13/00 वाजता | प्रमोद नामदेवराव राउत वय 36 वर्षे धंदा मजुरी रा न्यु स्वाभिमान नगर झोपडपट्टी अमरावती | अज्ञात | हकीकत असा प्रकारे आहे की, यातील पिर्यादी यांनी पो स्टे ला येवुन जबानी रिपोर्ट दिला की, मी पंधरा दिवसा अगोदर ऑटो डिल वेलफोयर असोसिएशन अमरावती येथुन एफसर एहमद अब्दुल कैसर रा अमरावती याचे कडुन एक बजाज कंपनीची पल्सर काळया रंगाची . ज्यावर लालरंगाचा पट्टा असलेली मोसा क्र MH-27AY-6058 ही 36000/- रुपयात घेतली होती पावसाळयाचे दिवस असल्यामुळे माझ्या घराकडे कच्चे रस्ते असल्याने रस्त्यावर चिखल असतो त्यामुळे मी रात्री घरी जातांनी माझी मोटर सायकल माझा भाऊ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | भादवि | अमरावती | दाखल ता वेळ<br><br>25/07/2023 चे 13/19 वाजता | | | विनोद नामदेवराव राउत रा अस्मिता शाळेच्या समोर पार्वती नगर नं 2 अमरावती यांचे घरी ठेवत असतो दि 22.07.2023 रोजी रात्री 11.30 वा ते दि 23.07.2023 रोजी 00.30 वा दरम्यान माझी बजाज कंपनीचा पल्सर काळया रगाची . ज्यावर लालरंगाचा पट्टा असलेली मोसा क्र MH-27AY-6058 ज्याचा चेसिस नं इMD211CZ9DWE27159,इंजिन नं-DHZWDD31434अशा वर्णानाची कोणीतरी अज्ञात चोरानेचोरुन नेली आहे अशा फिर्यादीचे जबानि रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

सरकारी नोकर हमला. :-

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ<br>माहिती ता.वेळ<br>गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| 1 | पां.स्टे. भातकुली 147/2023<br><br>कलम 353,504, 506 भादवि | आरोपीचे राहते घरासमोर चेचरवाडी ता. भातकुली | 25/07/23 चे 12.15. वा<br><br>/<br><br>दाखल ता.वेळ<br><br>25.07.2 | अजय दिलीपराव धाकडे वय 32 वर्षे व्यवसाय नोकरी – वरिष्ठ तंत्रज्ञ खारतेगांव वितरण केन्द रा पोटे | निलेश कैलाश देशमुख वय 35 वर्षे रा चेचरवाडी ता.भातकुली | हकीकत अशा प्रकारे आहे की,यातील फिर्यादी अजय दिलीपराव धाकडे वय 32 वर्षे व्यवसाय नोकरी यांनी पो.स्टे ला येवुन रिपोर्ट दिला की,मी महावितरण केन्द खारतळेगांव येथे मागील दिड वर्षेपासुन वरिष्ठ तंत्रज्ञ या पदावर नोकरी करीत आहे माझ्याकडे गांव चेचरवाडी,कुमागड,नवथश,झाशी,बदलापुर या गावाचे लाईन देखभाल व विजबिल वसुलीचे काम आहे आज दि.25/07/2023 रोजी कनिष्ठ अभियंता श्री गोपाल इंगळे साहेब यांच्या आदेशाने सकाळी 09.30 वा ग्राम चेचरवाडी येथे विजबील वसुली करीता गेलो व आपले शासकीय काम करीत होतो दुपारी 12.15 मीनीटाने् मी सोबत लाइनमन प्रधान तंत्रज्ञ शाम माउली सराटे असे श्री निलेश कैलाश देशमुख यांचे घराजवळ जाउन त्यांना लाइन बिल भरले का असे विचाराणा केले तर त्यांनी नाही म्हटले त्यावर मी त्यांचे घरी विज पुरवठा कुठुन घेतला आहे हे पाहत |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 3 चे 14.00 वा | टाउनशिपन .4 बालाजी नगर कठोरा बु. | | असतांना त्यांचे घरी गावात लागलेले लाइटचे खांबावरुन वायर टाकलेली दिसली त्यावेळी निलेश कैलाश देशमुख मला शिविगाळ करुन हातात लोखंडी रॉड घेवुन माझ्यावर मारण्याचा प्रयत्न केला त्यावेळी माझ्या सोबत असलेले प्रधान तंत्रज्ञ शाम सराटे यांनी तो रॉड पकडला त्यावेळी निलेश देशमुख यांनी धमकी दिली की,तु यानंतर गावात दिसला तर मी तुला सोडनार नाही म्हणुन तेथुन दुसरीकडे निघुन गेलो व आमचे वरिष्ठ जेई सर यांना फोन कोला नंतर काही वेळात आमचे वरिष्ठ त्या ठिकाणी आले व त्यांचे सोबत मी पो.स्टे ला रिपोर्ट देणेस आलो. निलेश कैलाश देशमुख यांचेवर कायदेशीर कारवाइ व्हावी करीता रिपोर्ट देत आहे अशा फिर्यादिचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ ईतर :-

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | बडनेरा अप.नं. ५४४/२३ कलम २८५ भा.दं.वि. | चाँदणी चौक, नवी वस्ती, बडनेरा | दि. २४.०७.२०२३ चे १८.१५ वा.<br>माहीती वेळ - दि. २४.०७.२३ चे १८.१५ वा.<br>दाखल ता. वेळ - दि. २५.०७.२३ चे ००.५६ वा. | सरतर्फे नापोका प्रविद्र राठोड ब.न १४५२ पोस्टे बडनेरा | अशोक मनिराम नंदागवळी, वय ५० वर्षे, रा. म्हाडा कॉलनी, नवी वस्ती, बडनेरा. | हकिकत अशा प्रकारे आहे की मा.व.पो.नि.सा.यांचे आदेशाने पोस्टे परिसरात पोस्टाफ सह पेट्रोलिंग करित असतांना नमुद घटना ता.व`ळी व ठिकाणी यातील नमुद आरीपी याने त्याच्या अन्नपुर्णा नावाचे टपरीवर घरगुती वापराचे गैंस सिलेंडर ठेवुन त्यावर खाद्य पदार्थ बनवुन विक्री करण्याकरित पदार्थ बनवित असतांना मिळुन आला नमुद इसमाच्या अशा ज्वालाग्राही पदार्थाचा वापरामुळे आग लागुन मानवी जिवीतास धोका निर्माण होउ नये याकरिता पुरेसा आवश्यक असलेला बंदोबस्त करण्याचे जाणीव पुर्वक टाळले वरुन नमुद आरोपी विरुध्द कलम २८५ भा.दं.वि.प्रमाणे होत असल्याने सदरचा गुन्हा दाखल |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | पो.स्टे. बडनेरा ५४५/२०२३अप.नं. ५४५/२३ कलम २२(ब), ८(क), २९ NDPS Act | बडनेरा ओव्हरब्रिज जवळ | दि. २४.०७.२३ चे २२.२८ वा ते दि. २५.०७.२३ चे ०१.१० वा. पावेतो. | सरतर्फे सहा. पो.नि. मनिष वाकोडे, गुन्हे शाखा, अमरावती शहर. | १)सुरज शिवकुमार तिवारी, वय ३३ वर्षे, रा. चिंचफैल, संतोषी माता मंदीर जवळ, पो.स्टे. राजापेठ, अम. शहर ह. मु. सुंदर नगर, मलाड वेस्ट , मुंबई चव्हाण यांचे चाळीमध्ये, २) आदेश पंचारिया, ३) पंकज उगले, ४) धिरज भुयार, सर्व रा. अमरावती, ५) मेहमुद नावाचा इसम, रा. भिवंडी, कल्याण फाटा, जि. ठाणे | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील फिर्यादी हे पो.स्टाफ सह आयुक्तालय हद्दीत अंमली पदार्थोची विक्री करणारे इसमांची माहीती काढण्याकरिता पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदाराकडुन माहीती मिळाली की, एक इसम हिरव्या रंगाची हाफ बाह्याची टी शर्ट आणि काळ्या रंगाचा कार्गो फुलपँट घातलेला इसम बडनेरा येथुन अमरावती कडे एम. डी. पावडरची विक्री करण्याकरिता येत आहे. अशा खात्रीलायक बातमीवरून नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी नमुद आरोपीवर पंचासमक्ष रेड केली असता त्याच्या ताब्यातुन १)३४.२७ ग्रँम वजनाचे पांढ-या रंगाचे रवेदार पांढ-या रंगाचे एम.डी पावडर अंमली पदार्थ, कि. अं. ३ लाख ४० हजार रूपये, २) एक विवो कंपनीचा मोबाईल, कि. अं. १०,०००/- रू. ३) एक दादर ते बडनेरा दि. २४.०७.२३ चे रेल्वेचे तिकीट, कि. अं. ००/- रू. असा एकुण ३ लाख ५० हजार रूपये चा माल मिळुन आला. सदर इसमाने त्याचे नाव सुरज शिवकुमार तिवारी, वय ३३ वर्षे, रा. चिंचफैल, संतोषी माता मंदीर जवळ, पो.स्टे. राजापेठ, अम. शहर ह. मु. सुंदर नगर, मलाड वेस्ट , मुंबई चव्हाण यांचे चाळीमध्ये असे सांगितले. सदर आरोपीने नमुद माल हा आरोपी क्र. २, ३, ४ यांचा असल्याचे सांगितले व त्याला मुंबई येथुन अमरावती येथे खेप आणण्याकरिता प्रति खेप ८०००/- रू. दिल्या जाते व सदर माल भिवडी कल्याण येथील राहणारा आरोपी क्र. ५ मेहमुद नावाच्या इसमाकडुन मुंबई येथुन आणल्याचे सांगितले वरून सदरचा गुन्हा दाखल |
| ३ | बडनरा ५४७/२३ कलम २८३ भा. दं. वि. | समता चौक, नवी वस्ती, बडनेरा | दि. २४.०७.२०२३ चे २०.३० वा.<br>माहीती वेळ - दि. २४.०७.२३ चे २०.३० वा.<br>दाखल ता. वेळ - दि. २५.०७.२३ चे ०६.२५ वा. | सरतर्फे नापोका ना.पो.का. इरफान रायलीवाले, ब.न. १८७१, पो.स्टे. बडनेरा. | शहजाद खान हबीब खान, वय ३० वर्षे, रा. अमन कॉलनी, नवी वस्ती, बडनेरा. | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील नमुद घटना ता.वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील ऑटो क्र. MH-२७-AF-२६०१ हा सार्वजनिक रस्त्यावर नागरिकांना व वाहतुकीस धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभा करून ठेवलेला मिळुन आला. वरून सदरचा गुन्हा दाखल |
| ४ | पो.स्टे राजापेठ अप.क्र.६८७/२३ कलम ३३६,४२७,५०४,५०६ भा.द.वि. | अमरावती | घ.ता.वेळ दि. २४/०७/२०२३ चे २०-३० वा. दरम्यान दा.ता.वेळ<br>दि. २५/०७/२०२३ चे ००-४३ वा. | एक महिला | राहुल मेश्राम रा. आदर्शनगर अमरावती | थोडक्यात हकीकत अशाप्रकारे आहे की,नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी घरी असतांना यातील आरोपी राहुल मेश्राम रा. आदर्श नगर हा फि. चे घरासमोर फि. ला पाहुन शिवीगाळ करू लागला त्यास हटकले असता त्याने हातात दगड घेवुन फेकुन मारला. तो फिर्यादीचे सासुला डोक्याला लागला व चारचाकी वाहनाचे कवर फाडुन व दगड फेकुन आवारातील स्टाईलचे नुकसान करून मारण्याची धमकी दिली. अशा फि.चे जबानी रिपोर्ट वरून व मडी. सर्टी .वरून सदरचा गुन्हा दाखल करून |

जुगार रेड :-

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ६ | ७ | ८ | ९ | १० | १२ |
| १ | बडनेरा अप क्र. ५४३/२३ कलम १२ अ म.जु.का | मा. पो. उप. आ. परि. १, अम. शहर. | राहुल नगर, जुनी वस्ती, बडनेरा. | दि. २४.०७.२३ चे २०.३० वा. | दि. २४.०७.२३ चे ०५.३६ वा. | सरतर्फे नापोका शशिकांत शेळके ब.न.१३६० पो,स्टे बडनेरा अम मो न .८२०८१६०८६१ | १)रमेश धनराज कैथवास, वय ३४ वर्षे रा. माताफैल, जुनी वस्ती, बडनेरा. २) स्वप्नील मोहनलाल चौधरी, वय ३२ वर्षे, रा. राहुल नगर जुनी वस्ती, बडनेरा.<br>३) विशाल महादेवराव चव्हाण, वय ३४ वर्षे, रा. अण्णाभाऊ साठे नगर, जुनी वस्ती, बडनेरा. (फरार) | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील फिर्यादी यांनी गुप्त बातमीदाराकडुन मिळालेल्या माहितीप्रमाणे पो.स्टाफ च्या मदतीने नमुद आरोपीवर जुगार रेड केली असता त्यांच्या ताब्यातुन नगदी ३८२०/- रु. ०१ ते १० आकडयाच्या वरली मटका जुगाराच्या चिठया असा एकुण ३८२०/- रु चा जुगार मुददेमाल मिळुन आला. आरोपी क्र. ३ हा पोलीसांची चाहुल लागताच तेथुन पळुन गेला. वरून सदरचा गुन्हा दाखल |

मर्ग —

| अ.क्र. | पो.ठाणे / मर्ग क्र व कलम | घटनास्थळ घ.ता.वेळ व दा.ता. वेळ | मृतकाचे नाव | फिर्यादी | अकस्मात मृत्युचे विवरण |
|---|---|---|---|---|---|
| १ | पो.स्टे. राजापेठ मर्ग क्र. ७७/२०२३ कलम १७४ जा.फौ. | घटनास्थळ - प्रेम इंडस्ट्रीज एम.आय.डि.सी. अमरावती<br>घ.ता.वेळ दि. २४/०७/२०२३ चे २२-४० वा. पुर्वी<br>दा.ता.वेळ - दि. २५/०७/२०२३ चे ०१-३९ वा. | अनिल भिमरावजी आजनकर वय ५५ वर्ष रा. वसंतविहार एम आर कॉलनी चव्हाण यांच्याकडे भाड्याने अमरावती | प्रणव अनिल आजनकर वय २२ वर्ष रा. वसंतविहार एम आर कॉलनी चव्हाण यांच्याकडे भाड्याने अमरावती | आज दि. २४/०७/२०२३ चे २१-०० वा. ते दि. २५/०७/२०२३ चे ०८-०० वा. पावेतो तपास मदत ड्युटी असता इर्विन दवाखाना येथुन मेमो प्राप्त झाला तसेच फिर्यादी नामे प्रणव अनिल आजनकर हा पो.स्टे. ला हजर येवुन त्यांनी जबानी रिपोर्ट दिला की, त्याचे वडिल नामे अनिल भिमरावजी आजनकर वय ५५ वर्ष हे प्रेम इंडस्ट्रीज एम.आय.डि.सी. अमरावती येथे काम करीत असतांना त्यांचे अंगावर सरकीचे पोते पडल्याने तेथील सहकारी मजुरांनी त्यांना उपचापाकरीता इर्विन दवाखाना येथे घेवुन गेले असता तेथे एम.ओ. सा. यांनी मरण पावल्याचे सांगत आहे. वरून पो.स्टे. ला सदरचा मर्ग दाखल करून तपासात घेतला. सदरची बॉडी हे इर्विन मर्च्युरी येथे पी.एम. करीता ठेवण्यात आली आहे. |